समरी क्रि.के.नं.९५/२०२६

Exh. 5/C

**मे. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारीसो, कागल**
**यांचे कोर्टात ....**

**विलास केशव पाटील** ........ फिर्यादी

विरूद्ध

**विद्या विजयकुमार पाटील** ......... आरोपी

ORDER
Read and recorded

J.M.F.C.
20.04.26

## ॲफिडेव्हीट

मी आनंदा भैरू राणे, व.व.३१, धंदा : शेती, रा. राणेवाडी, माद्याळ, ता. कागल, जि. कोल्हापूर शपथपूर्वक ॲफिडेव्हीट करतो की,

१) मी यातील फिर्यादी यांना ओळखतो, मी फिर्यादी यांचा मुलगा मारूती यांचा बालपणापासून मित्रआहे. तसेच फिर्यादी यांच्या घरी माझे येणे—जाणे आहे. सदरचे आरोपी व आरोपीच्या कुटुंबाला मी ओळखतो.

२) यातील आरोपी यांनी कौटुंबिक अडचणीकरीता व आत्मगरजेपोटी व मुलांचे शिक्षणाकरीता फिर्यादी यांचेकडे हातउसणी रोख रक्कम रू. ४,५०,०००/— ची मागणी केली. त्याप्रमाणे, फिर्यादी व आरोपी यांचे मैत्रीचे संबंध असलेने फिर्यादी यांनी आरोपीला रक्कम रू. ४,५०,०००/— दिले व आरोपीने सदरचे व्यवहाराच्या मोबदल्यात फिर्यादी यांना राजे विक्रमसिंह घाटगे को—ऑप. बॅंक लि. कागल, शाखा — लक्ष्मीपुरी या बॅंकेचे दोन चेक दिले.

३) यातील फिर्यादी यांनी आरोपी यांचेकडे दिले पैशांनी मागणी केली असता आरोपी यांनी सदरचे दोन्ही चेक फिर्यादी यांना बॅंकेत भरून घेणेस सांगितले व उर्वरित रक्कम रू. ४,५०,०००/— नंतर देतो असे सांगितले. त्यानंतर, फिर्यादी यांनी सदरचे दोन्ही चेक आपले एच.डी.एफ.सी बॅंक शाखा मुरगूड येथे भरले असता सदर दिवशी चेक न वटता परत आले आहेत. म्हणून फिर्यादी यांनी मे. कोर्टात फिर्याद दाखल केलेली आहे. हे मला प्रत्यक्षात माहिती आहे.

Asstt. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

येणेप्रमाणे वर नमूद कलम १ ते ४ मधील संपूर्ण मजकूर माझे प्रत्यक्ष माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केले ॲफिडेव्हीट. आज मु।। कागल ता २०/०४/२०२६

मी फिर्यादी यांना ओळखतो

Gaikwad.

ॲड. ए. जे. गायकवाड–पाटील

**प्रतिज्ञा**

मी आनंदा भैरू राणे सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, वरील ॲफिडेव्हीटमधील संपूर्ण मजकूर खरा व बरोबर आहे. म्हणून केली प्रतिज्ञा. आज मु।। कागल दि.२०/०४/२०२६

Solemnly Affirmed before me by
Shri Ananda Bhairu Rane
Age 31 of Ranewadi, Kagal who is
identified by Shri A.J. Gaikwad-patil Adv
............whom I know personally
Dated :- 20/4/26

Assistant Superintendent

PRANITA SUHAS PATIL
Digitally signed by PRANITA SUHAS PATIL
Date: 2026.04.20 16:04:17 +0530